# यावल महाविद्यालयात प्राणिशास्त्र सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न

यावल (प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव द्वारा संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागामार्फत दिनांक 27 डिसेंबर 20 21 रोजी महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्राणीशास्त्र सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन ऑनलाईन करण्यात आले होते .या स्पर्धेत एकूण 125 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी, त्यांचा स्पर्धापरीक्षेच्या दृष्टीने सराव व्हावा व त्यांच्यात चौफेर वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने सदर स्पर्धेचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले होते .या स्पर्धेत  युक्ती चौधरी प्रथम ,दीपक धनगर द्वितीय व कोमल खलसे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच  जयश्री धनगर व गायत्री लोखंडे यांना उत्तेजनार्थ बक्षीस घोषित करण्यात आले .सदर स्पर्धेचे आयोजन   श्री मयूर सोनवणे यांनी केले होते .

यशस्वी स्पर्धकांचे उपप्राचार्य प्रा.ए. पी. पाटील ,प्रा .एम .डी .खैरनार, श्री संजय पाटील  ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधु भगिनींनी अभिनंदन केले.

पुण्य नगरी

# यावल महाविद्यालयात प्राणीशास्त्र सामान्यज्ञान स्पर्धा

यावल :येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागामार्फत दि.२७ डिसेंबर रोजी महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्राणीशास्त्र सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन ऑनलाईन करण्यात आले होते .या स्पर्धेत एकूण १२५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी,त्यांचा स्पर्धापरीक्षेच्या दृष्टीने सराव व्हावा व त्यांच्यात चौफेर वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले होते.या स्पर्धेत युक्ती चौधरी प्रथम ,दीपक धनगर द्वितीय व कोमल खलसे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच जयश्री धनगर व गायत्री लोखंडे यांना उत्तेजनार्थ बक्षीस घोषित करण्यात आले .सदर स्पर्धेचे आयोजन श्री मयूर सोनवणे यांनी केले होते .यशस्वी स्पर्धकांचे उपप्राचार्य प्रा.ए. पी. पाटील ,प्रा .एम .डी .खैरनार, श्री संजय पाटील ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधु भगिनींनी अभिनंदन केले.